# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वीजेच्या धक्क्याने दरवर्षी हजारो कर्मचारी बळी जात असल्याबाबत**

**(१) १९६२३ (१६-०८-२०१६) डॉ.अपूर्व हिरे :** तारांकित प्रश्न क्रमांक १५९६३ ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीजेच्या धक्क्याने दरवर्षी ४० ते ५० वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना प्राणांतिक अपघात होत असल्याच्या पार्श्वभुमीवर तारमार्ग कर्मचाऱ्यांना शासनाच्या धर्तीवर सैध्दांतिक व प्रात्यक्षिक अभ्यासक्रम समाविष्ट असलेले कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याच्या विचाराधीन बाबींवर कंपनीचा विचार पुर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पुढे कोणता निर्णय घेण्यात आला वा सदरहु महत्वाच्या बाबींवरील विचार केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,
(३) राज्यात ठिकठिकाणी महावितरणाचे ट्रान्सफार्मर उघड्यावर असणे, पोलची झालेली दुरवस्था, कमकुवत झालेल्या तारा, खाजगी अनधिकृत व्यक्तींकडून ट्रान्सफार्मर व पोलवरील वीजेच्या तारांमध्ये केली जाणारी छेडछाड, बेकायदेशीर कनेक्शन घेण्याचे प्रकार यामुळेही पुनःपुनः अपघात होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वीज चोरी रोखणे व अनधिकृत हाताळणीमुळे होणारे अपघात रोखणेसंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) महावितरणच्या प्रशिक्षण धोरणानुसार कर्मचाऱ्यांचे कौशल्य विकसित करण्याकरीता आय-टी-आय उत्तीर्ण कर्मचारी विद्युत सहाय्यक, उपकेंद्र

सहाय्यक यांना प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, नाशिक, सांगली, अमरावती व औरंगाबाद येथे प्रशिक्षण देण्यात येते व वीजेच्या धक्क्यामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्याकरिता सुरक्षा बाबतचे प्रशिक्षण प्र व सु. एकलहरे, नाशिक तसेच प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रामार्फत परिमंडळ, मंडळ व विभागीय स्तरावर सातत्याने प्रशिक्षण देण्यात येते.

(२) महावितरणच्या प्रशिक्षण धोरणानुसार सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेविषयी प्रशिक्षणाचे कार्यक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

(३) व (४) वीज चोरी रोखण्यासाठी सुरक्षा व दक्षता विभागांतर्गत ४३ भरारी पथके व वीज चोरी प्रकरणे रोखण्यासाठी ६ स्वतंत्र पोलीस स्थानकांची स्थापना करण्यात आली आहे.

विद्युत सुरक्षेविषयी ग्राहक व जनतेत जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध स्तरावर रॅलीचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षण व सुरक्षा विभाग, नाशिक अंतर्गत कार्यरत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र नाशिक, अमरावती, औरंगाबाद व सांगली या विभागाव्दारे ग्राहकांना सुरक्षाविषयी मार्गदर्शन करणारे कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील गावांत वीजेचे खांब लावण्याबाबत

**(२) १९८४७ (१६-०८-२०१६) श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील गावांत महावितरणने वीजेचे मीटर पुरविले. परंतु सदर वीज वाहून नेण्यासाठी लोखंड खांबच दिले नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार डहाणू तालुक्यातील गावांत वीज वाहून नेण्यासाठी लोखंडी खांब लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

बुरकटपाडा व पाटीलपाडा येथे साधारणत: १५ लाभार्थींना शासनाने घरकुल मंजूर केले. सदर लाभार्थ्यांच्या घरकुलाचे विद्युतीकरण झालेले नव्हते. परंतु उपरोक्त लाभार्थी "बुरकटपाडा" येथे जुने विद्युत ग्राहक असल्यामुळे त्यांनी महावितरण कपंनीची अधिकृत परवानगी न घेता त्यांच्या विद्युत जोडण्या परस्पर नवीन ठिकाणी स्थलांतरित केल्या. सदर स्थलांतर करताना त्यांच्या जोडण्यांना असणाऱ्या सर्व्हिस वायरला आधाराकरिता लाकडी खांब उभारण्यात आले.

(२) सदर काम जिल्हा नियोजन (वाडीपाडा विद्युतीकरण डीपीडीसी) योजनेमध्ये सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित करुन मंजूर करण्यात येऊन सदर काम दिनांक १६/१०/२०१६ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चिंचोली (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांना नियमित विद्युत पुरवठा देण्याबाबत**

**(३) १९८६१ (१६-०८-२०१६) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिंचोली (ता.आष्टी, जि. वर्धा) येथील शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत पुरवठा खंडित केल्याने संत्रा झाडांसह इतर पिके धोक्यात आल्याने शेतकऱ्याने जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे आत्महत्येची परवानगी माहे मे, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना नियमित विद्युत पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) महावितरण कंपनीला बनावट कागदपत्र सादर करुन शेतीपंपाकरिता वीज पुरवठा घेतल्याने चिंचोली, ता. आष्टी, जि. वर्धा येथील ग्राहकाच्या शेतीपंपाचा वीज पुरवठा पूर्वसूचना देऊन दिनांक ४/५/२०१६ रोजी खंडित करण्यात आला होता.

(२) याबाबत दिनांक १८/४/२०१६ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता पोलीस स्टेशन, आष्टी यांना कळविण्यात आले आहे. तथापि, त्यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर प्रकरणी कनिष्ठ विधी अधिकारी, प्रविभागीय कार्यालय महावितरण, वर्धा यांच्या तपासणीत सदर कागदपत्रे योग्य असल्याचे निदर्शनास आल्याने सदर ग्राहकाच्या कृषीपंपाचा वीज पुरवठा दिनांक २१/५/२०१६ रोजी पूर्ववत जोडण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील देवस्थान जमिनीवरील खाजगी मालकांचे अतिक्रम हटविण्याबाबत**

**(४) २०६३८ (१६-०८-२०१६) श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात १४० देवस्थानच्या २ हजार ८६० इतके क्षेत्र असून या जमिनींची फेरफार तपासणीची कार्यवाही शासनाकडून करण्यात आली असता देवस्थानच्या जमिनीच्या केलेल्या सर्वेक्षणात अनेक जमिनीवर खाजगी मालकांनी अतिक्रमण केल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०५-२०१७) :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यात एकूण १४० देवस्थान इनाम गावे असून देवस्थानांची एकूण संख्या २०३ इतकी आहे तसेच देवस्थानाचे क्षेत्र २०३ इतकी आहे तसेच देवस्थानाचे क्षेत्र ३१७१-४३.७४ हे.आर. आहे. देवस्थान इनाम जमिनीच्या तपासणीची मोहिम जिल्हास्तरावर राबवून बेकायदेशीररित्या वा शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय झालेल्या अनधिकृत हस्तांतरणाच्या एकूण ७४४ फेरफारां पैकी ४०२ फेरफार नोंदींचे पुन:रिक्षण विहीत असून उर्वरीत ३४२ फेरफार नोंदींचे पुन:रिक्षण करण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे.

---

## उष्माघाताने मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(५) २०८५० (१९-०८-२०१६) श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील बडनेरा रेल्वे परिसरात एका व्यक्तिचा उष्माघाताने व मौजे सावळखेडा (ता.आष्टी, जि.बीड) येथे ११ वर्षीय शाळकरी मुलाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याच्या दोन घटना माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर नैसर्गिक आपत्तीमुळे मृत पावलेल्या मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०५-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयातील बडनेरा रेल्वे परिसरात एका व्यक्तिचा मृत्यू Sevear Anamia & Hypoglycemia ने झाल्याचे शव विच्छेदन अहवालात आढळून आले आहे. तर मौजे साबलखेड, ता.आष्टी, जि.बीड येथील १२ वर्षीय मुलीचा मृत्यू उष्माघातामुळे झाला असल्याचे आढळून आले आहे.

(२) उपरोक्त दोन्हीही मृत्यू हे केंद्र शासनाने विहित केलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या निकषात बसत नसल्याने सदर प्रकरणी शासन धोरणानुसार आर्थिक मदत अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यासादर कला महाविद्यालयातील (ता.रामटेक, जि.नागपूर) बी.कॉम. च्या इंग्रजी पेपरच्या वेळी निर्माण झालेला गोंधळ

**(६) २१३६१ (२३-०८-२०१६) प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठांतर्गत रामटेक येथील विद्यासादर कला महाविद्यालयातील परिक्षा केंद्रावर दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी बी.कॉमच्या इंग्रजी पेपर ९.३० ते १२.३० या वेळेत मोठ्या प्रमाणात सावळागोंधळ निर्माण झाल्याने महाविद्यालयाने उशीरा पेपर सुरू केल्याची घटना दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व सबंधित महाविद्यालयावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाविद्यालयामार्फत सदर केंद्रावर केंद्राधिकाऱ्याद्वारे दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी लेखी परिक्षा आयोजनाचेवेळी परीक्षा सुरु करण्यास काही तांत्रिक कारणामुळे ३१ मिनिटे उशिर झाला होता. विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान न होण्याच्या दृष्टीने सदर पेपर सोडविण्यासाठी ठराविक वेळेनंतर ३१ मिनिटांपर्यंत जास्तीची वेळ विद्यार्थ्यांना देण्यात आली होती.

(२) सदर प्रकरण दिनांक २०/०५/२०१६ रोजी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ३२(६) (अ) अंतर्गत गठीत अनुशासनात्मक कृती समितीकडे तपासणीस्तव सोपविण्यात आले होते. त्यानुषंगाने अनुशासन कृती समितीचा तपासणी अहवाल प्राप्त झाला असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार सदर अहवालातील शिफारशींवर पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरात तापी योजनेची मागील थकबाकी व महापालिकेचे चालू विद्युत देयक माफी मिळण्याबाबत

**(७) २१६८२ (१६-०८-२०१६) श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या तापी योजनेची मागील थकबाकी व महापालिकेचे चालू विद्युत देयक माफी मिळावी अशी मागणी मा.ऊर्जा मंत्र्यांकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने तापी योजनेच्या थकबाकीसह वीज बिल माफी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरणमार्फत विद्युत देयके माफ करण्याची कोणतीही योजना नाही. तथापि धुळे मंडळांतर्गत उच्चदाब सार्वजनिक पाणी पुरवठयाचे एकूण ०६ ग्राहक आहेत त्यापैकी २ उच्चदाब ग्राहक थकबाकी मध्ये असून सदर दोनही ग्राहकांनी पेयजल पाणीपुरवठा संजीवनी योजना, २०१५ मध्ये सहभाग घेतलेला असून ते नियमितपणे दरमहा वीज बिल भरणा करत आहेत. इतर ४ ग्राहकांची विद्युत देयके थकबाकी मध्ये नसून नियमित भरली जात आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपास वीज जोडणी देण्याबाबत

**(८) २१८२४ (१६-०८-२०१६) श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या नियमानुसार शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर ८ दिवसाच्या आत वीज जोडणी देणे बंधनकारक असतानाही राज्यातील २ लाख १० हजार शेतकरी कृषी पंपाच्या वीज

जोडणीपासून वंचित असल्याची बाब मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या पाच जिल्ह्यातील ७५६९३ कृषी पंपाना वीज जोडण्या देण्याचे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सौर कृषी पंप योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ५ लाख कृषीपंप वितरीत करण्यात येणार असून याबाबत शासनाने काही कालबध्द कार्यक्रम आखले आहेत काय, सन २०१५-२०१६ मध्ये वितरीत करण्यात आलेल्या कृषी पंपाची जिल्हावार संख्या किती आहे,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना वीज जोडणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) राज्यात मे, २०१६ अखेर १,९९,३९३ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते.

(२) अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या पाच जिल्ह्यात मे, २०१६ अखेर अनुक्रमे ८७३३, ९३७५, ८३७९, ९९४७ व ७५१८ असे एकूण ४३९५२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते.

(३) राज्यात १०,००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्याची पथदर्शी प्रकल्प एकत्रितपणे राबविण्याबाबत महाऊर्जा व महावितरण यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. एप्रिल, २०१७ अखेर अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे १६४, २८८, २७८, ३९६ व २३० इतके सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

(४) एप्रिल, २०१७ अखेर सदर पथदर्शी प्रकल्पांतर्गत ८४९४ अर्ज प्राप्त झाले असून, जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समित्यांमार्फत एकूण ४९३५ शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांपैकी ३२८१ लाभार्थ्यांनी आवश्यक रक्कमेचा भरणा महावितरण कंपनीकडे केला आहे. माहे एप्रिल, २०१७ अखेर २४५२ शेतकऱ्यांना सौर कृषीपंप आस्थापित करुन देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक प्राधिकरणामधून पीएचडी, एमफिलच्या प्रस्तावाना मार्गी लावणारी संशोधन व मान्यता समिती (आरआरसी) नसल्याबाबत

**(९) २२०६३ (२३-०८-२०१६) आर्कि.अनंत गाडगीळ :** तारांकित प्रश्न क्रमांक १६२२५ ला दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक प्राधिकरणामधून पीएचडी, एमफिलच्या प्रस्तावाना मार्गी लावणारी संशोधन व मान्यता समिती (आरआरसी) नसल्याने गेले सात महिन्यात एकाही

संशोधनाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली नसून त्यामुळे तब्बल १८५ संशोधनाचे प्रस्ताव विद्यापीठाकडे मान्यतेच्या प्रतिक्षेत प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी आरआरसीची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

आतापर्यंत संशोधन व मान्यता समिती कार्यगटाच्या (आर.आर.सी.) एकूण २३० पेक्षा जास्त बैठका संपन्न झाल्या आहेत. त्याद्वारे उपलब्ध ९८ विषयांच्या ३०८४ प्रस्तावांवर निर्णय झाले असून त्यावर पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत एकही प्रस्ताव प्रलंबित नाही.

(२) सदर प्रकरणी विषयानुरुप एकूण ९८ संशोधन व मान्यता समिती कार्यगट गठीत करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यात कृषी पंपाना विद्युत जोडण्या देण्याबाबत**

**(१०) २२१५७ (१६-०८-२०१६) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात २८ हजार ७८० कृषी पंप विद्युत जोडण्या प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मराठवाड्यातील प्रलंबित असलेल्या कृषी पंपाना विद्युत जोडण्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

मराठवाडयामध्ये मार्च, २०१६ अखेर २९१११ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून मार्च, २०१७ पर्यंत विविध योजनेंतर्गत २१,७३३ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. मार्च, २०१७ अखेर ४५,००७ कृषीपंप धारक पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित आहेत. विदर्भ मराठवाडा विशेष पॅकेज, जिल्हा नियोजन समिती तसेच इन्फ्रा-२ योजनेंतर्गत प्रलंबित कृषी जोडण्या सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद व मराठवाडयातील गोल्डन ट्रान्सपोर्ट ट्रँगलच्या प्रलंबित कामांबाबत

**(११) २२१८४ (१९-०८-२०१६) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहर आणि मराठवाडयाला गोल्डन ट्रान्सपोर्ट ट्रँगलमध्ये आणण्यासाठी सुमारे रुपये १८ हजार कोटीच्या निधीची तरतूद करूनही सदर काम धीम्या गतीने सुरु असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१७) :** (१) व (२) बाबत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

मा.केंद्रीय मंत्री रस्ते वाहतूक व महामार्ग यांच्या उपस्थितीत दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी औरंगाबाद येथे रु. १७,७०६ कोटी अंदाजित किंमतीच्या १५२८.६० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे बांधकामाचे प्रतिकात्मक भूमिपूजन करण्यात आले आहे.

त्यापैकी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत रु.६७७८ कोटी अंदाजित किंमतीच्या ४०२ कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाच्या पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण/चौपदरीकरणाच्या विविध प्रकल्पांची बांधकामे प्रगतीत आहे.

तसेच मराठवाडयातील १०८९ कि.मी. रस्ते तत्वत: राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आलेले असून त्यापैकी औरंगाबाद ते जळगांव हया १५० कि.मी. महामार्गाच्या रुंदीकरणासाठी रु. १००० कोटी अंदाजित किंमतीचे प्रकल्प निविदा स्तरावर असून उर्वरीत रस्त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणा (जि.नागपूर) येथील एम.आय.डी.सी मधील उद्योग बंद पडल्याने कामगार बेरोजगार झाल्याबाबत

**(१२) २२३३१ (१९-०८-२०१६) प्रा.अनिल सोले :** तारांकित प्रश्न क्रमांक १४८९७ ला दिनांक १० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा (जि.नागपूर) येथील एम.आय.डी.सी मधील ४०० पेक्षा अधिक उद्योग बंद पडल्याने परिसरातील हजारो कामगार बेरोजगार झाल्याचे दिनांक ७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योग केव्हा बंद करण्यात आले व त्याची कारणे काय आहेत,

**श्री. सुभाष देसाई (०९-०५-२०१७) :** (१) हिंगणा औद्योगिक क्षेत्राचे सांख्यिकीय अहवालानुसार आजमितीस बंद उद्योगाची संख्या १३७ आहे.
(२) हिंगणा औद्योगिक क्षेत्र सन-१९६३ च्या सुमारास स्थापित झाले असून दरम्यानच्या काळात उद्योग घटकास, उद्योग घटकाची आर्थिक अडचण, तयार मालास बाजारपेठ उपलब्ध न होणे आणि जागतिक मंदीचा परिणाम इत्यादी अनेक कारणामुळे उद्योग घटक प्रामुख्याने बंद पडले आहेत.

---

## धुळे जिल्हयातील शेतकरी व घरगुती वीज जोडणी देण्याबाबत

**(१३) २२३९९ (१६-०८-२०१६) श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील ५ हजार शेतकरी व ३ हजार घरगुती वीज जोडणी देण्याचे आश्वासन मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.ऊर्जा मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार शेतकरी व घरगुती वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) धुळे जिल्हयामध्ये मार्च, २०१५ अखेर ३,८८८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१५-१६ मध्ये १७८० इतक्या कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये ५२२८ कृषीपंप वीज जोडणीकरिता पैसे भरुन प्रलंबित होते. मार्च, २०१७ अखेर २०४४ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. मार्च, २०१६ अखेर ९९६ घरगुती ग्राहक पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी मार्च, २०१७ अखेर ८७३ घरगुती वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग-मुंबई या मार्गावर एसटीची वातानुकूलित वोल्वो बससेवा सुरू करण्याबाबत

**(१४) २२८२२ (१६-०८-२०१६) श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या शिवनेरी या वाहतूकीच्या धर्तीवर अलिबाग-मुंबई या मार्गावर एस.टी.ची वातानुकुलित व्होल्वो बस सुरू करण्याबाबत तसेच अलिबाग एसटी स्टँड परिसरात सीसीटीव्ही बसविण्याबाबत वर्षभराचा कालावधी होऊनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले

व तद्नुसार अलिबाग-मुंबई ही एसटीची व्होल्वो वातानुकूलित बससेवा सुरू करण्याबाबत तसेच, अलिबाग एसटी स्टँडवर सीसीटीव्ही बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१७) :** (१) व (२) वातानुकूलित सेवा चालविण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडे मर्यादेत स्वरुपात वातानुकूलित बसेस उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत अलिबाग-मुंबई मार्गावर २० निमआराम व ११ साध्या फेऱ्या सुरु आहेत.

केंद्रिय सहाय्य योजनेंतर्गत मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवे (MORTH), भारत सरकार यांच्याकडून प्रकल्प निधी मिळविण्यासाठी राज्य शासनाद्वारे दिनांक १६/०३/२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या आगारांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी आकस्किकता निधीतून रकमा काढण्यात आल्याबाबत

**(१५) २३३७० (१९-०८-२०१६) आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी आकस्मिकता निधीतून सन २०१४-१५ मध्ये रकमा काढण्यात आल्या मात्र त्याचा वापर अनुक्रमे १२.२६ टक्के, ६.८७ टक्के आणि १७.१६ टक्केच करण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी अखर्चित ठेवण्याबाबत कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील वीज नसलेल्या गावांना पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेच्या माध्यमातून वीज जोडणी देण्याबाबत

**(१६) २३७१७ (१६-१२-२०१६) श्री.नारायण राणे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७७३१ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४० हजार ९५६ गावांपैकी २८९ गावात अद्यापी वीज पोहचलेली नसल्याचे दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेच्या संकेतस्थळावरील उपलब्ध माहितीवरून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावांपैकी बहुसंख्य गावे आदिवासी व दुर्गम भागातील असून अद्याप २ हजार ९३ वाडया व पाडयांचे विद्युतीकरण झालेले नसल्याचे तसेच १९,३६,६९० कुंटूंबे आजही वीज जोडण्यापासून वंचित असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज जोडण्यापासून वंचित गावांना केंद्र शासनाच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेच्या माध्यमातून विनाविलंब वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर २०९३ वाडी पाड्यांपैकी २३२ वाडी पाड्यांचे विद्युतीकरण केंद्र शासनाच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना व ३४७ वाडी पाड्यांचे विद्युतीकरण जिल्हा योजना/आदिवासी व बिगर आदिवासी उपयोजना या योजनेद्वारे करण्यात येत आहे. उर्वरित १५१४ वाडी पाड्यांचे विद्युतीकरण बाकी आहे. २८० गावांचे व १५१४ वाडी पाड्यांचे पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यासाठी सर्वेक्षण करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महावितरण कंपनीस देण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील १८,७३,०८६ घरकुल व शहरी भागातील ६३६०४ घरकुल मिळून एकूण १९,३६,६९० घरकुलांना वीज जोडण्या देण्याचे प्रलंबित असून त्यापैकी ग्रामीण भागातील १२,४८,४७४ घरकुलांना वीज पुरवठा देण्यासाठी पायाभूत सुविधा दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्याती योजनेत करण्यात येत असून त्यामध्ये ३,९६,१९६ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना वीज जोडणी देण्याचे काम अंतभूत आहे. उर्वरित ६८८२१६ घरकुलांना स्थानिक पातळीवर जिल्हा वार्षिक नियोजन योजनेमध्ये वीज जोडणी टप्प्याटप्प्याने देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेतीसाठी नियमित विद्युत पुरवठा करण्याबाबत

**(१७) २४३२६ (१६-१२-२०१६) श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाण्याअभावी पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शेतीसाठी १२ तास विद्युत पुरवठा करण्याच्या दिलेल्या आदेशाचे पालन महावितरण करीत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही. शासनाच्या निर्देशानुसार महावितरणने दिनांक ०८/०९/२०१६ पासून राज्यातील सर्व कृषी ग्राहकांना १२ तास थ्री फेज वीज पुरवठा दिनांक १५/१२/२०१६ पर्यंत उपलब्ध करुन दिला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात क्रिडा विभागात बीपीएड ऐवजी बीपीईस आणि एमपीएड ऐवजी एमपीईएस हया दोन पदव्या नव्याने सुरु करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१८) २४४५४ (१६-१२-२०१६) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रीडा विभागात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बीपीएड ऐवजी बीपीईस आणि एमपीएड ऐवजी एमपीईएस हया दोन पदव्या नव्याने सुरु करण्याचा शासनाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी नव्या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक शाळेमध्ये, विद्यालयात व कॉन्व्हेंटमध्ये १०० विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा शिक्षक नेमण्याचे धोरण शासन आणणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व शारिरीक विद्यालये व शारिरीक शिक्षण महाविद्यालयात शासन अनुदानित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ०२/०५/२०१६ च्या अधिसूचनेनुसार बीपीई पदवीऐवजी बीपीईएस व एमपीई पदवीऐवजी एमपीईएस अशा पदव्या देण्यात याव्यात असे निदेश सर्व विद्यापीठांना प्राप्त झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या त्यांच्या दिनांक ३१/०५/२०१६ च्या पत्रान्वये सर्व विद्यापीठांना बीपीई पदवीऐवजी बीपीईएस व एमपीई पदवीऐवजी एमपीईएस पदवी प्रदान करण्याबाबत सूचित केले असून त्यानुसार पुनर्रचना करण्याबाबत कळविले आहे.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींनुसार अतिथी निदेशक यांचे पथक तयार करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१५ अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

(४) सर्व कायम विना अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## राज्य वीज मंडळाच्या मनमानी कारभाराबाबत

**(१९) २४४८५ (१९-०४-२०१७) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज मंडळातील अधिकारी/कर्मचारी वीज वसुलीच्या उध्दिष्ट पूर्तीसाठी ग्राहकांना वेठीस धरणे, अवमानीत करणे इत्यादी गैरप्रकार करीत असल्याने मराठवाडा जनता विकास परिषद व वीज ग्राहकांनी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे सन २०१५-१६ मध्ये तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले, त्यानुसार दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) व (२) मराठवाडा परिसरांतर्गत औरंगाबाद, लातूर व नांदेड ही परिमंडळ कार्यालये येतात. राज्य वीज मंडळातील अधिकारी/कर्मचारी वीज वसुलीच्या उद्दीष्ट पूर्तीसाठी ग्राहकांना वेठीस धरणे, अवमानीत करणे असे गैरप्रकार करत असल्याबाबत मराठवाडा जनता विकास परिषद व वीज ग्राहकांचे निवेदन वा तक्रार वरील परिमंडळा अंतर्गत प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ग्राहक संस्था, महिला बचत गट आणि सामाजिक मंडळाच्या माध्यमातून स्वतंत्र दूध विक्री व्यवस्था करण्याबाबत

**(२०) २४७८९ (३०-१२-२०१६) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांकडून उपलब्ध झालेल्या दुधाची विक्री करण्यासाठी ग्राहक संस्था, महिला बचत गट आणि सामाजिक मंडळाच्या माध्यमातून स्वतंत्र विक्री व्यवस्था उभी करणार असल्याची माहिती राज्याचे मा.कृषी व पणन राज्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ग्राहक संस्था, महिला बचत गट, सामाजिक मंडळामार्फत स्वतंत्र दुध व्यवस्था उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०४-२०१७) :** (१) नाही

(२) (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नियमित वीज देयके भरणाऱ्या ग्राहकांसाठी प्रोत्साहनपर योजना राबविण्याबाबत**

**(२१) २५४८० (०४-०१-२०१७) श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणने अनेक कालावधीपासून देयके थकित असलेल्या विद्युत ग्राहकांकरिता थकित देयकाच्या रकमेवरील व्याज व दंडमाफीसह मूळ रक्कम भरल्यास त्यावर ५% मूळ रकमेत सूट देणारी अभय योजना जाहिर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे ग्राहक नियमित वीज देयक भरत आहेत त्यांना कोणतीही आर्थिक सवलत महावितरण देत नसल्याने त्यांचेसाठी प्रोत्साहनपर नविन योजना महावितरण अस्तित्वात आणणार आहे काय,

(३) नसल्यास, याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील वीज ग्राहकाने आपले वीज बिल वेळेत व नियमित भरणे अपेक्षित असून सदर ग्राहकांनी वीज बिल तारखेच्या मुदतीत भरल्यास अशा ग्राहकांना तत्पर देयक भरणा सूट वीज देयकांमध्ये देण्यात येते. तसेच राज्यातील औद्योगिक ग्राहकांनी मा. वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या वीज दर आदेशातील अटी व शर्तीनुसार लोड फॅक्टर पॉवर फॅक्टर राखल्यास अशा ग्राहकांना वीज देयकांमध्ये सवलत देण्याची तरतूद आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील सातारा ते पुणे ह्या महामार्गाचे सहा पदरीकरणाचे कामाबाबत विस्तृतपणे विचारणा करण्याबाबत**

**(२२) २५६५० (३०-१२-२०१६) श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील सातारा ते पुणे दरम्यानच्या महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम अतिशय संथगतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याने सदर काम करणाऱ्या कंपनीने अनेक नियमांचे उल्लंघन केल्याने या कंपनी विरोधात कारवाई करण्याची मागणी पुणे विभागाच्या आयोजित केलेल्या बैठकीत खा.उदयनराजे भोसले यांनी केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांचेकडे दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासदारांनी या बैठकीमध्ये रिलायन्स कंपनी विरोधात केलेले आरोप कोणकोणते, तसेच केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्री यांनी या कंपनीला कारवाईबाबत नोटीस पाठविण्याच्या दिलेल्या आश्वासनानुसार सदर कंपनीला कधी नोटीस देण्यात आली व त्या नोटीसीत नमूद करण्यात आलेल्या बाबी कोणत्या आहेत,

(३) असल्यास, सातारा ते पुणे ह्या महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम रिलायन्स कंपनीकडून कधी सुरु करण्यात आले, सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी किती महिन्यांचा होता, तसेच

सदर कामाला अंदाजे येणारा खर्च किती कोटी रुपये व या काळात कंपनीमार्फत टोलवसुली करण्यात येत होती, त्याद्वारे कंपनीने किती रुपये मिळविले याबाबतचा सविस्तर तपशील काय आहे,

(४) या कंपनीने कराराप्रमाणे काम न केल्यामुळे त्यांचेविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१७) :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे आहे.

मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री यांनी दि.१४/०८/२०१६ रोजी पुणे येथे सर्व लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या समवेत घेतलेल्या बैठकीमध्ये रिलायन्स इन्फ्रा. कंपनीमार्फत सुरु असलेल्या पुणे सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा झाली. त्याअनुषंगाने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडून १३ ऑक्टोंबर, २०१६ रोजी कंपनीला विविध मुद्यांबाबत नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीला सवलतदार रिलायन्स इन्फ्रा. कंपनीने दिनांक २७/१०/२०१६ च्या पत्रान्वये दिलेल्या स्पष्टीकरणाची छाननी करण्यात येऊन सवलतदारास महामार्गाची देखभाल व सुरक्षेच्या उपाययोजना करण्यासंदर्भात कळविण्यात आले आहेत.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत पुणे ते सातारा ह्या १४० कि.मी. राष्ट्रीय महामार्गाचे खाजगीकरणातून सहापदरीकरणाचे काम मे.पुणे सातारा टोलरोड प्रा. लि. सवलतकाराला दिनांक ०१/१०/२०१० रोजी देण्यात आले असून सदरील काम दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, जुनी भुसंपादनाची प्रकरणे, वृक्ष छाटणी परवानगी, वनजमिनीचे हस्तांतरण, तसेच कामाच्या वावात बदलाची मागणी, सेवा वाहिन्यांचे स्थलांतर ह्या कारणामुळे कामास विलंब झालेला आहे.

ह्या प्रकल्पाला रु.१७२४.२५ कोटी खर्च अपेक्षित आहे. ह्या महामार्गाच्या पथकर नाक्यावर दिनांक १०/११/२०१६ अखेर चौपदीकरणाच्या प्रकल्पासाठी सुरु असलेल्या पथकरापोटी रु.१०५७.९३ कोटी वसूली झाली असून त्यापैकी रु.६३३.७५ कोटी सवलतकाराने केंद्र शासनाकडे जमा केले आहे असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

---

**मौजे जवळे (दु) (ता.जि.उस्मानाबाद) येथील जमीन खरेदी विक्री गैरव्यवहाराबाबत**

**(२३) २५८७७ (३०-१२-२०१६) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जवळे (दु) (ता.जि.उस्मानाबाद) येथील गट नं २८३/२, २८३/४, २८३/५ व आळणी येथील गट नं. ३३९ मधील जमीन खरेदी विक्रीमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारासंदर्भात यापूर्वीही माहे नोव्हेबर, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदंयाना एका निवेदनाद्वारे सदर बाब निदर्शनास आणूनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०५-२०१७) :** (१), (२), (३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे प्रकरणात सर्व संबंधितांची सुनावणी घेवून दिनांक २०/७/२०१५ रोजी निर्णय पारित केला. त्यामध्ये अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येवून मौजे आळणी येथील गट नं. २३९ बाबत झालेला फेरफार क्र.२५४६ हा रद्द करण्यात आला. तसेच मौजे जवळे (दु.) येथील गट क्र.१३५१ हा देखील महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मधील तरतुदींचा भंग झाल्यामुळे रद्द करण्यात आला व इतर स.नं. मधील फेरफार मंजूर करण्याबाबत गैरअर्जदार यांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली आहे.

या निर्णयाच्या विरोधात संबंधितांनी अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या न्यायालयात अपिल सादर केले होते. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी प्रकरणात सुनावणी घेवून अपिलार्थीचे अपिल अंशत: मंजूर करुन प्रकरण फेरचौकशीसाठी उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांच्या कार्यालयाकडे दिनांक १०/१०/२०१६ रोजी परत पाठविले आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरणात अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे फेरचौकशी चालू आहे.

---

## कराड (जि.सातारा) तालुक्यातील विजयनगर व मुंडे येथील दुहेरी प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(२४) २६०६२ (१६-१२-२०१६) श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील विजयनगर व मुंडे येथील दुहेरी प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून कंपनीत नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात येऊनही महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्तांना नोकरीत प्राधान्याने सामावून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०५-२०१७) :** (१) शासनाच्या व महापारेषण कंपनीच्या धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये प्राधान्य देणेबाबत कार्यवाही केली जाते.

(२) महापारेषण कंपनीने तंत्रज्ञ श्रेणी - ४ या पदासाठी पात्र अशा महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देणेकरीता सरळसेवा भरतीमधील लेखी ऑन-लाईन परिक्षेस त्यांना मिळालेल्या गुणांच्या १० अतिरिक्त गुण (weightage) देण्याचे धोरण निश्चित केलेले आहे.

तसेच महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण योजना, ५ ते २५ अतिरिक्त गुण योजना व नोकरीच्या बदल्यात रु. ५ लाख एक रक्कमी अनुदान देण्याचे धोरण निश्चित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी गॅस आणि विद्‌युत प्रकल्पातील पॉवर ब्लॉकमधील टर्बाइनच्या रोटरचे ब्लेड चोरी झाल्याबाबत

**(२५) २६१४५ (१६-१२-२०१६) श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रत्नागिरी गॅस आणि विद्‌युत प्रकल्प कंपनीला कैंद्रिय सुरक्षा यंत्रणेची सुरक्षा असतानाही पॉवर ब्लॉकमधील टर्बाइनच्या रोटरचे रुपये १ कोटी १७ लाख किंमतीचे ६ ब्लेड चोरी झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे. परंतु पॉवर ब्लॉकमधील टर्बाइनच्या रोटरच्या सदर ६ ब्लेडची किंमत अंदाजे रुपये ८४ लाख इतकी आहे.

(२) सदर प्रकरणी रत्नागिरी गॅस आणि पॉवर कंपनीने संबंधित पोलीस स्टेशनकडे तक्रार नोंदविलेली असून तपासामध्ये चोरी गेलेल्या सदर ६ ब्लेड पैकी ५ ब्लेड कंपनीस प्राप्त झाले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संत गाडगेबाबा अमरावती विद्‌यापीठाच्या संपूर्ण परीक्षा प्रक्रियेमध्ये ऑनलाईन निकाल जाहीर करण्याबाबत

**(२६) २६१५७ (१६-१२-२०१६) श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्‌यापीठाने संपूर्ण परीक्षा प्रक्रियेमध्ये संगणकीय मदत घेत ऑनलाईन निकाल जाहीर करण्यापर्यंतची जबाबदारी एका आय.टी.कंपनीला दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या कंपनीसोबत किती कालावधीसाठी विद्‌यापीठाने करार केला आहे व परीक्षा पद्धत ते निकाल या संपूर्ण प्रक्रियेबाबत युजीसी तसेच विद्‌यापीठांच्या गाईडलाइन्स/नियमांबाबत संबंधित कंपनीला अवगत करुन देण्यात आले होते काय,

(३) असल्यास, परीक्षा पार पडल्यानंतर किती दिवसांत निकाल जाहीर करणे बंधनकारक असते व सदर कंपनीने विधी तसेच इतर विषयाचे निकाल किती दिवसांनी जाहीर केले आणि या प्रक्रियेमध्ये युजीसी तसेच विद्‌यापीठांच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, फेर-मूल्यांकन पद्धतीतही सदर कंपनीने सदोष काम केले असल्याचे व त्यामुळे असंख्य विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे निष्पन्न झाले असून सदर प्रकरणी दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच विद्‌यार्थ्यांच्या झालेल्या शैक्षणिक नुकसानीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) Mindlogicx Infratec aLtd, Banglore या कंपनीशी दिनांक १६/२/२०१६ पासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी करार करण्यात आला आहे व परीक्षा पध्दत ते निकाल या संपूर्ण प्रक्रियेबाबत युजीसी तसेच विद्यापीठांच्या गाईडलाइन्स/नियमांबाबत संबंधित कंपनीला अवगत करुन देण्यात आले आहे.

(३) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७२ मधील तरतुदीनुसार कमीत कमी ३० दिवसाचे आत व जास्तीत जास्त ४५ दिवसांचे आत निकाल जाहीर करणे आवश्यक आहे.

सदर कंपनीने विधी तसेच इतर विषयांचे निकाल जाहीर करण्यास ४५ दिवसांच्या मर्यादेपेक्षा अधिक कालावधी लागलेला आहे. त्यामुळे युजीसी तसेच विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे हे खरे आहे.

(४) सदर कंपनीला विद्यापीठाने ताकीदपत्र दिले आहे. मूळ निकाल उशीरा लागले असले तरी पुनर्मुल्यांकनाचे निकाल वेळेत लागले आहेत. पुनर्मुल्यांकन निकालासंदर्भात विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे प्राप्त झलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागातून ऊर्जा विभागात समायोजन केलेले अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिल्याबाबत.**

**(२७) २६१६८ (४-१-२०१७) श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागातून शासन निर्णय दि.३० मार्च, २०१६ रोजी विद्युत निरीक्षण शाखा, ऊर्जा विभागाकडे हस्तांतर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना ऊर्जा विभागातून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जावयाचे असेल त्यांनी त्यांचे विकल्प दि.२० मे, २०१५ पर्यंत सादर करावे असे पत्रक प्रभारी मुख्य विद्युत निरीक्षक यांनी काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

तथापि, शासन निर्णय दिनांक २६/०२/२०१५ व दिनांक २४/०४/२०१५ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील विद्युत निरिक्षणालय शाखा, ऊर्जा विभागाकडे हस्तांतरित करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) शासन निर्णय दिनांक २४/०४/२०१५ अन्वये सध्या विद्युत निरिक्षणालयांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी जे अधिकारी/कर्मचारी सार्वजनिक बांधकाम विभागात जाण्यास इच्छुक असतील अशा अधिकारी/कर्मचारी यांचे विकल्प घ्यावेत व संक्रमण काळ समन्वय समितीकडे सादर करावेत असे मुख्य विद्युत निरिक्षक यांना सूचित करण्यात आले

होते. त्याअनुषंगाने मुख्य विद्युत निरिक्षक यांनी त्यांच्या दिनांक ०७/०५/२०१५ व दिनांक १८/०५/२०१५ अन्वये अधिनस्त सर्व अधिक्षक अभियंता यांचेमार्फत दिनांक २०/५/२०१५ पर्यंत विकल्प सादर करण्याबाबत विद्युत निरिक्षणालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविले होते. तसेच त्यांनी त्यांच्या दिनांक ०४/११/२०१५ च्या पत्रान्वये ऊर्जा विभागात राहण्यास इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांना विकल्प सादर करण्यास पुन्हा कळविले होते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खैरी (जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत**

**(२८) २६१७७ (३०-१२-२०१६) श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खैरी (जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांची जमीन सन १९९८ मध्ये संपादित करुन अद्याप सदर शेतकऱ्यांना शासनाकडून मोबदला दिला नसल्याने अपर जिल्हाधिकारी यांचे वाहन व चार संगणक जप्त करण्यात आल्याची घटना दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.
खैरी हे गांव राळेगांव तालुक्यामध्ये येत आहे. अप्पर जिल्हाधिकारी यांचे वाहन जप्त करण्याची घटना ही जिल्हाधिकारी यवतमाळ येथील शेतकरी श्री.सोमेश्वर दिगांबर महाजन यांचेशी संबंधित आहे. यांची जमीन सन १९९८ मध्ये संपादित करण्यात आली होती. सदर प्रकरणात अप्पर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे वाहन क्र.एम.एच.२९ एम ९२९९ व चार संगणक दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी जप्त करण्यात आले होते.
(२) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सदर प्रकरणात निधी प्राप्त करुन घेऊन सदर प्रकरणातील मोबदल्याची रक्कम धनादेश क्र. २७९१९८ दिनांक १०/१०/२०१६ रक्कम रुपये १,९८,१३,५६७/- (एक कोटी, अठ्यान्नव लाख, तेरा हजार, पाचशे सदुसष्ठ रुपये फक्त) हि वि.दिवाणी न्यायाधिश, (व.स्तर) यवतमाळ यांचे न्यायालयामध्ये दिनांक १३/१०/२०१६ रोजी जमा करण्यात आली आहे.
(३) लागू नाही.

---

### सोलापूर येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करणेबाबत

**(२९) २६१९८ (३०-१२-२०१६) श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात शासकीय कृषी महाविद्यालये सुरु आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा शासकीय कृषी महाविद्यालयामुळे महाविद्यालयाच्या परिसरात कृषी विकास होण्यास मदत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात अशा स्वरूपाचे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१३-०४-२०१७) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून सोलापूर जिल्ह्यात शासकीय कृषि महाविद्यालय, मुळेगांव जिल्हा सोलापूर (कार्यकारी परीषद ठराव क्र.१३/८४/२०११) व शासकीय कृषि महाविद्यालय, पंढरपूर जि.सोलापूर (कार्यकारी परिषद ठराव क१६/९०/२०१५) येथे कृषि महाविद्यालयाचे स्थापन करणेबाबतचे प्रस्ताव यापुर्वीच सादर करण्यात आले असून प्रस्तावित दोन ठिकाणी पैकी एका ठिकाणी शासकीय कृषि महाविद्यालये स्थापन करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नवापूर ते अमरावती (जि.जळगाव) या पट्टयातील महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

**(३०) २६३२७ (३०-१२-२०१६) श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर ते अमरावती (जि.जळगाव) या भागातील महामार्गाच्या चौपदरीकरण करण्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या रस्त्याच्या कामासाठी जमीन संपादित करून महामार्गाच्या चौपदरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१७) :** (१) व (२) अमरावतीपासून जळगाव ते गुजरात हद्द हा ४८०.७९ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत हाती घेण्यात आली आहे. रस्त्यासाठी ९५% जमीन संपादीत झालेली आहे.

अमरावती ते चिखली ह्या १९४ कि.मी. आणि फागणे ते गुजरात हद्द ह्या १४०.७९ कि.मी. महामार्गाच्या चौपदीकरणासाठी दिनांक ९/११/२०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून काम प्राथमिक अवस्थेत आहे.

उर्वरीत चिखली ते फागणे ह्या १५०.०० कि.मी. महामार्गाच्या दोन भागात निविदा निश्चिती करण्यात आल्या आहेत. असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे व अमरावती यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवापूर (जि.नंदूरबार) तालुक्यातील रंगावली नदीच्या मोठ्या पुलाची झालेली दुरवस्था**

**(३१) २६४४० (३०-१२-२०१६) श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदूरबार) तालुक्यातील रंगावली नदीच्या मोठ्या पुलावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नविन मोठ्या पुलावरील रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१७) :** (१) व (२) राष्ट्रीय राजमार्ग क्र.६, फागणे ते महाराष्ट्र-गुजरात सिमेपर्यंतचे लांबीवरील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत दिनांक ०९/११/२०१६ रोजी सुरु झालेले आहे. सद्य:स्थितीत नवापूर येथील रंगावली नदीच्या पुलावरील मोठे खड्डे भरण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत रस्त्याची अवस्था वाहतुकीस ठीक आहे, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठामधील माजी सैनिक सुरक्षा रक्षकांना ६ व्या वेतन आयोगाच्या फरकेची रक्कम मिळण्याबाबत**

**(३२) २६५९५ (१६-१२-२०१६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठामधील माजी ३५ सैनिक सुरक्षा रक्षकांना ६व्या वेतन आयोगाच्या फरक मिळणेस १० वर्षाचा विलंब झाला असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सैनिकांना फरकेची रक्कम त्वरीत देणेसाठी संबधितांना आदेश देण्याबाबत तसेच त्यांची सेवापुस्तके भरुन त्यांना प्रत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
शिवाजी विद्यापीठातील सैनिक सुरक्षा रक्षकांना ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम सन २०१३ मध्ये अदा करण्यात आलेली आहे.
(२) संबंधितांच्या बाबतीत विद्यापीठ नियुक्ती प्राधिकारी असल्याने विद्यापीठाकडून त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी अद्ययावत करून त्यांना त्याची प्रत देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या नियमबाह्य कारभारामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(३३) २६९०५ (१२-०४-२०१७) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची कागदपत्रे जमा केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयाच्या नियमबाह्य कारभारामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयांवर कारवाई करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. सन २०१२ ते २०१५ या वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे नांवनोंदणी क्रमांक (PRN) देण्याचे राहिले होते त्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे जमा करुन नांव नोंदणी क्रमांक घेण्यास परिपत्रकान्वये महाविद्यालयांस सांगितले होते. काही विद्यार्थी सोडून गेले आहेत व काही विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केलेले आहेत असे महाविद्यालयांनी विद्यापीठाला कळविले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुही (जि.नागपूर) नगर पंचायतीने खरेदी केलेले बल्ब निकामी झाल्याबाबत**

**(३४) २७२०४ (१२-०४-२०१७) प्रा.अनिल सोले, श्री. परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) नगर पंचायत येथील माहे जुलै व सप्टेंबर, २०१६ मध्ये विद्युत खाबांवर लावण्यासाठी खरेदी केलेल्या एकूण १८० सी.एफ.एल बल्ब पैकी १७५ बल्ब निकामी झाले असल्याचे कुही विकास मंचाने मागितलेल्या माहितीच्या अधिकारावरून दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१७) :** (१) होय.

(२) ग्रामपंचायतीच्या काळात बसविलेले व जुलै, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत निकामी झालेले १७५ बल्ब कुही नगरपंचायतीकडून बदलण्यात आले. नव्याने खरेदी केलेले बल्ब निकामी झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी येथे विद्यापीठ उपक्रेंद्र स्थापन करण्याबाबत

**(३५) २७७८१ (१२-०४-२०१७) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत उपकेद्रांच्या स्थापनेकरीता कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जागेची पाहणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपकेंद्र स्थापन करण्यासाठी जागेची निश्चितता व पुढील प्रक्रियेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) उपकेंद्राबाबत धोरण निश्चित करण्यासाठी डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालानुसार उपकेंद्राबाबतचे धोरण स्विकारावे किंवा कसे ही बाब तपासण्यात येत असल्याने त्यावर शासनाने अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत येणा-या विभागातील रिक्त पदे भरणेबाबत

**(३६) २८४९९ (१३-०४-२०१७) श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.संजय दत्त, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात विविध संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत येणा-या विभागात 'अ','ब','क' आणि 'ड' प्रवर्गातील मंजूर १४ हजार ६३६ पैकी १० हजार ४७६ पदे कार्यरत असली तरीही त्यातील अनेक कर्मचारी-अधिकारी हे मागील काही वर्षात निवृत्त झाल्याने सुमारे ४ हजार १६० हून अधिक पदे रिक्त आहेत व याव्यतिरिक्त पदांपैकी सर्वात जास्त पदे ही अधिकारीस्तरावर असल्याने कौशल्य विकासाच्या अंमलबजावणीवर त्याचा थेट परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या कर्मचारी-अधिकारी संघटनेने शासनाकडे रिक्त जागांच्या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केला असून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने अपु-या कर्मचारी वर्गामुळे कामाचा अधिक ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०६-२०१७) :** (१) होय, हे अंशत खरे आहे.

(२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत गट- अ, ब, क व ड संवर्गात १४६३५ इतकी पदे मंजूर असून, त्यापैकी ४२७१ पदे रिक्त आहेत. यामध्ये गट-अ व ब संवर्गातील अधिकारी स्तरावरील मंजूर ९०१ पदांपैकी ३८० पदे रिक्त आहेत. तथापि, सदरहू रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून कामकाज सुरळीतपणे सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांवर तासिका तत्वावर शिक्षकांची नेमणूक करुन प्रशिक्षण सुरु आहे. त्यामुळे कौशल्य विकासाच्या अंमलबजावणीवर परिणाम झालेला नाही.

(३) गट-अ व ब संवर्गातील अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे तसेच गट-क संवर्गातील रिक्त असलेली पदेही सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-ड संवर्गातील पदे वित्त विभागाच्या धोरणानुसार मंजूर पदांपैकी २५% पदे निरसीत करावयाची असून, पदांच्या आढाव्यांतर्गत समायोजनाची कार्यवाही करण्यासाठी गट-ड संवर्गातील पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) २८८९९ (१२-०४-२०१७) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील प्राध्यापकांच्या मंजूर असलेल्या १३९ पदांपैकी ५६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अभियांत्रिकी महाविद्यालयाची मुख्य इमारत व कार्यशाळा इमारतीचे छत खराब झाले असून सदर संस्थेत २००० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी रुपये १ कोटी ४० लक्ष इतक्या रकमेची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयातील रिक्त पदे भरुन इमारत दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील स्वायत्त व अस्वायत्त महाविद्यालयातील एकत्रित पदांच्या बिंदूनामावल्या प्रमाणित करण्याची व त्याअनुषंगाने आयोगास मागणीपत्रे पाठविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

प्रश्नाधीन संस्थेच्या इमारत दुरुस्तीच्या रुपये १३४.९७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दिनांक ०३/०१/२०१७ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा वाढण्याबाबत**

**(३८) २९७६५ (१२-०४-२०१७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय इतर अभियांत्रिकी महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी ५० महाविद्यालयांना मार्गदर्शन करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता कार्यक्रम आखला आहे वा आखण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) :** (१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जानेवारी महिन्यात जाहीर केलेल्या “मार्गदर्शक” या नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेने अभियांत्रिकी महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(२) सदरची योजना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची आहे. राज्य शासनाची सदरची योजना नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) कार्यालयीन पदांची निर्मिती करणेबाबत**

**(३९) ३००३८ (१३-०४-२०१७) श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील १० वर्षामध्ये प्रत्येक तालुक्यात नवीन आय.टी.आय. तसेच तांत्रिक विद्यालय सुरु करण्यात आली असून त्यामुळे व्यवसायाचा विकास झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवसाय निहाय शिल्प निदेशक/शिक्षक/भांडारपाल/वसतिगृह अधिक्षक/कनिष्ठ लिपिक/वरिष्ठ लिपिक/मुख्य लिपिक/चौकीदार/कर्मशाळा परिचर इत्यादी कार्यालयीन पदाची निर्मिती झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पदाच्या निर्मितीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०६-२०१७) :** (१) हे अशंत: खरे आहे.

राज्यात मागील १० वर्षात ३८ औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. तसेच ३४ शासकीय तांत्रिक विद्यालय सुरु करण्यात आलेली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील नवनिर्मित ३२ तालुक्यांमध्ये नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासाठी दिनांक २१/०९/२००६ च्या शासन निर्णयान्वये ५७६ पदे, अनुसूचित जाती व नवबौध्द मुलामुलींसाठी दिनांक ०१/०१/२००६ च्या शासन निर्णयान्वये १२८ पदे तसेच

अल्पसंख्यांकांसाठी दोन नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था व नवीन तुकडयांसाठी दिनांक २९/०८/२००९ च्या शासन निर्णयान्वये ४१७ पदे निर्माण करण्यात आली आहे.

माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रमाचा विद्यार्थी/भांडवली अनुशेष दुर करण्यासाठी ३४ शासकीय तंत्र माध्यमिक विद्यालयापैकी प्रत्यक्ष प्रवेश देण्यात आलेल्या ३१ संस्थांसाठी दिनांक ०४/०५/२०११ च्या शासन निर्णयान्वये एकूण १३२ पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, आवश्यक असलेल्या उर्वरित ८७ पदांची पदनिर्मिती वित्त विभागाच्या दिनांक ०८/०७/२०१४ च्या शासन परिपत्रकानुसार पदभरतीस बंदी असल्याने अद्याप होऊ शकलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्याबाबत**

**(४०) ३०१९३ (१२-०४-२०१७) श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील औरंगाबाद व नांदेड उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयांतर्गत असलेल्या त्या-त्या जिल्हयातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या माहे जानेवारी, २०१७ पर्यंतच्या पावत्या देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित जिल्हयातील शिक्षकक्कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नांदेडमधील सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या संबंधित महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आल्या आहेत. तसेच, औरंगाबादमधील सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये ८१ महाविद्यालयांतील २२२५ शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या वितरित करण्यात आल्या आहेत. उर्वरित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, सन २०१६-१७ हे आर्थिक वर्ष नुकतेच संपले असून भविष्य निर्वाह निधीच्या ३१ मार्च, २०१७ अखेरच्या पावत्या तयार करण्याची कार्यवाही चालू आाहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित वरीष्ठ महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन करण्याबाबत**

**(४१) ३०१९६ (१२-०४-२०१७) श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित जिल्हानिहाय वरिष्ठ महाविद्यालयांची (कला, वाणिज्य व विज्ञान) एकूण संख्या किती आहे व त्यापैकी किती महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन करण्यात आलेले आहे,

(२) असल्यास, नॅक मुल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१)

| जिल्हाचे नाव | महाविद्यालयाची संख्या | नॅक मुल्यांकन झालेल्या महाविद्यालयाची संख्या |
|---|---|---|
| अमरावती | ५१ | ३९ |
| अकोला | २५ | १३ |
| वाशिम | १९ | ११ |
| यवतमाळ | ३२ | १८ |
| बुलढाणा | २६ | १६ |
| औरंगाबाद | ३९ | २७ |
| जालना | १४ | १२ |
| बीड | ४० | ३२ |
| उस्मानाबाद | २२ | २० |
| जळगाव | ४० | ३९ |
| धुळे | २७ | २५ |
| नंदुरबार | १६ | १४ |
| कोल्हापूर | ५४ | ५० |
| सांगली | ३८ | ३८ |
| सातारा | ४१ | ४१ |
| मुंबई शहर | ३३ | २९ |
| मुंबई उपनगर | ६७ | ६२ |
| नागूपर | ६८ | ५८ |
| वर्धा | २२ | १९ |
| भंडारा | २३ | १३ |
| गोंदिया | १५ | १० |
| चंद्रपुर | ३९ | २६ |
| गडचिरोली | २३ | १३ |
| नांदेड | ३३ | २३ |
| लातुर | ३६ | २६ |
| परभणी | १९ | १४ |

| | | |
|---|---|---|
| हिंगोली | ०९ | ०७ |
| ठाणे | ३४ | ३० |
| पालघर | १२ | ११ |
| रायगड | २५ | २४ |
| रत्नागिरी | १३ | १३ |
| सिंधुदुर्ग | १० | ०९ |
| पुणे | ८२ | ८० |
| अहमदनगर | ४६ | ४२ |
| नाशिक | ३९ | ३७ |
| सोलापुर | ४० | ३८ |
| एकूण | ११७२ | ९७९ |

(२) संबधित महाविद्यालयाना नॅक मुल्यांकन करुन घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मानधनाबाबत**

**(४२) ३०१९७ (१२-०४-२०१७) श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर माहे जानेवारी, २०१७ पर्यंत कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(२) असल्यास, त्यांना मासिक मानधन दरमहा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांचे मानधन दरमहा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१) प्राध्यापकांची जिल्हानिहाय एकूण संख्या ८७३८ असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. अमरावती - | ५४१, | १९. वर्धा - | ८० |
| २. अकोला - | ३८४ | २०. भंडारा - | १२५ |
| ३. वाशिम - | १९१ | २१. गोंदिया - | १७२ |
| ४. यवतमाळ - | २४० | २२. चंद्रपूर - | २८७ |
| ५. बुलढाणा - | १९२ | २३. गडचिरोली - | ८८ |
| ६. औरंगाबाद - | ४४८ | २४. नांदेड - | ५३१ |
| ७. जालना - | ११६ | २५. लातूर - | ३९७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. बीड - | ३४६ | २६. परभणी - | १९६ |
| ९. उस्मानाबाद - | १९१ | २७. हिंगोली - | ६२ |
| १०. जळगाव - | १४० | २८. ठाणे - | १२० |
| ११. धुळे - | १९१ | २९. पालघर - | १९ |
| १२. नंदुरबार - | १६० | ३०. रायगड - | ६६ |
| १३. कोल्हापूर - | ८४४ | ३१. रत्नागिरी - | ३५ |
| १४. सांगली - | ५७९ | ३२. सिंधुदूर्ग - | २६ |
| १५. सातारा - | ५३९ | ३३. पुणे - | ११७ |
| १६. मुंबई शहर - | १ | ३४. अहमदनगर - | १९ |
| १७. मुंबई उपनगर - | ५ | ३५. नाशिक - | २ |
| १८. नागपूर - | ७३० | ३६. सोलापूर - | ५५८ |

(२) अंशत: खरे आहे.

(३) तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधन अदा करण्यातील विलंब टाळण्यासाठी कार्यपध्दतीत सुधारणा करण्याच्या सूचना शासनाच्या क्र. वितांप्र-२०१५/(४७२/१५)/मशि-१ दिनांक १८/१२/२०१५ अन्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना देण्यात आल्या आहेत. तसेच संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २१/०१/२०१६ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक आणि सर्व अकृषी विद्यापीठे यांना सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कात्रज (जि.पुणे) येथील टेल्को कॉलनीमधील एकाच कुटूंबातील चौघांनी आत्महत्या केल्याबाबत

**(४३) ३०२३६ (१३-०४-२०१७) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज (जि.पुणे) येथील टेल्को कंपनीच्या कॉलनीमध्ये राहणाऱ्या एकाच कुटूंबातील चौघांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याची घटना दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर कुटूंबातील पती पत्नी यांचे पैशाच्या हिशोबाच्या कारणावरुन सतत वाद होत होते. सदर वादाच्या कारणावरुन पतीने आपली पत्नी व दोन मुलींचा नायलॉन दोरीने व हाताने गळा आवळून खून केला व स्वत: राहते घराच्या हॉलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. ६९/२०१७ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ (जि.नांदेड) येथील**
**स्वीय सहाय्यक पद सरळसेवेने भरण्याबाबत**

**(४४) ३०६०४ (१२-०४-२०१७) श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ (जि.नांदेड) यांनी माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये स्वीय सहाय्यक पद सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरातीस अनुसरुन अनेक बेरोजगार उमेदवारांनी अर्ज भरले तसेच पात्र उमेदवारांची लेखीपरिक्षा, कौशल्य चाचणी परिक्षा घेण्यात आली व मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असतानाही उक्त पद सरळसेवेने न भरता पदोन्नतीने भरण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेरोजगारांची फसवणूक करुन सदर पद पदोन्नतीने भरणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने दिनांक २२/०२/२०१२ रोजी स्वीय सहायक हे पद सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात दिलेली होती .सदर जाहिरातीच्या अनुषंगाने या सरळसेवेच्या पदसाठी आवेदन पत्र मागविण्यात आली. त्यानुसार उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात आली. परंतु सदर पदसाठी लघुलेखन चाचणी, टंकलेखन चाचणी आणि मुलाखत आदी प्रक्रिया बाकी होत्या.

सदर लेखी परिक्षेत केवळ एकच उमेदवार पात्र झाल्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने पुनश्च: जाहिरात देण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, तद्नंतर विद्यापीठाने विविध पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भात गठीत केलेल्या साखळी समितीने दिनांक १७/०२/२०१५ च्या अहवालामध्ये “स्वीय सहायक” हे पद पदोन्नतीस दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुसार विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने तसेच शासन राजपत्र दिनांक दिनांक २४ जून, १९९७ मधील तरतुदीनुसार जून, २०१६ मध्ये सदरचे स्वीय सहायकाचे पद पदोन्नतीने भरण्यात आलेले आहे.

(३) प्रकरणी विद्यापीठाच्या दिनांक २८/०२/२०१७ अन्वये प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक २१/०४/२०१७ च्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून माहिती मागविण्यात आली असून प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील यमाई तलावाच्या दुरुस्तीच्या कामाबाबत**

**(४५) ४२५१७ (२८-०८-२०१३) श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतीश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील यमाई तलावाच्या दुरूस्तीच्या कामाची प्रगती सद्य:स्थिती काय आहे,

(२) या तलावाच्या दुरुस्तीचे काम केव्हापासून सुरु आहे व त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) या तलावाच्या दुरुस्तीचे काम अत्यंत मंदगतीने सुरु असल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :** (१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील यमाई तलरव दुरूस्ती अंतर्गत तलावाचे भोवती कुंपण घालणे, सांडपाणी प्रक्रिया करणे, बांधाचे मजबुतीकरण व पेव्हींग करणे तसेच तलाव बांधालगत बसणेची व्यवस्था, लँडस्केप, विद्युतीकरण, पाईप लाईन टाकणे इत्यादी सन २०१०-२०११ मध्ये प्रस्तावित केलेली कामे सद्य:स्थितीत पूर्ण झालेली आहेत.
(२) सन २००७ पासून सन २०११-१२ पर्यंत एकूण अंदाजित ४.३६ कोटी रुपये इतका खर्च करणेत आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या भुमी जिंदगी विभागातर्फे संकलिक करण्यात येत असलेल्या पालिकेच्या मिळकती संदर्भात माहिती येत असताना गैरव्यवहार झालेले आढळून आल्याबाबत**

**(४६) ४२७२२ (३०-०८-२०१३) श्री. अनिल भोसले, श्री. जयवंतराव जाधव, श्री. सतीश चव्हाण, :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूणे महानगरपालिकेच्या भूमी जिंदगी विभागातर्फे संकलित करण्यात येत असलेल्या पालिकेच्या मिळकती संदर्भात माहिती घेत असतांना मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान असे निदर्शनास आले आहे की प्रामुख्याने झोपडपट्टी भागात शेकडो समाजमंदिरे बांधली गेली परंतु समाजमंदिरांची नेमकी संख्या किती व ती सध्या कोणाच्या ताब्यात आहेत याची तपशीलवार माहिती उपलब्ध होवू शकलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी शासन ठोस पावले उचलणार आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेतर्फे प्रामुख्याने झोपडपट्टी भागातील नागरिकांच्या सोयीकरिता महानगरपालिका निधी तसेच आमदार/खासदार निधीतून समाजमंदिरे बांधण्यात येतात. सदर मिळकत बांधण्यामागचा हेतू व्यावसायिक स्वरुपाचा नसून नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन देण्याचा असतो अशा स्वरुपाची बांधकामे महानगरपालिकेच्या क्षेत्रिय कार्यालय व भवन विभागाच्या स्तरावर करण्यात येतात व अशा स्वरुपाची बांधकामे तयार झाल्यांनंतर संबंधित भागातील सामाजिक संस्थांना देखभाल दुरुस्तीकरिता संबंधित क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर देण्यात येतात. सदर बांधकामे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालयामार्फत केली जात

असल्यामुळे तसेच अशा मिळकतीची विनियोग देखील संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत होत असल्यामुळे सर्वच समाजमंदिरांची एकत्रित माहिती उपलब्ध नव्हती. तथापि, सदर माहिती संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे स्तरावर उपलब्ध आहे.

पुणे महानगरपालिकेच्या सर्व मिळकतीची माहिती एकत्रितरित्या संकलित करण्याकरिता भूमी आणि जिंदगी विभागामार्फत संगणकप्रणाली तयार करण्यात आली असून त्याकामी संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत सर्वच मिळकतीची माहिती संकलित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत २६४ समाजमंदिरांची माहिती संगणकीकृत झालेली आहे. तसेच संगणकीकरणाकरिता आवश्यक असलेल्या तपशीलांमध्ये काही मिळकतीची माहिती संकलित करण्याचे काम चालू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचक (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दारिद्रयरेषेखालील कुटूंबाना शेवग्याच्या शेगांची रोपे देण्याबाबत**

**(४७) ४५२०९ (१७-०१-२०१४) श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दारिद्रयरेषेखाली असलेल्या ३२५ कुटुंबाचे उत्पन्न वाढावे याकरीता दिनांक २३ मे, २०१३ व दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी ग्रामविकास विभागाला सदर कुटुंबानी शेवग्याच्या शेंगाची रोपे द्यावीत अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली या करण्यात येत आहे.

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (३१-०३-२०१७) :** (१) पाचल (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दारिद्रयरेषेखाली असलेल्या ३२५ कुटुंबांना शेवग्याच्या शेंगाची रोपे देण्याची मागणी मा.लोकप्रतिनीधींनी मा.ग्रामविकास मंत्री महोदयांना दिनांक ०८/१०/२०१३ रोजी केली होती, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हापरिषद रत्नागिरी यांच्याकडून शेवग्याची रोपे वाटपाबाबतची योजना राबविण्यात आलेली नाही. मात्र, सन २०१३-१४ मध्ये रत्नागिरी जिल्हयात राष्ट्रीय कृषी तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत अग्रीम निधीतून शासकीय रोप वाटीकेवर तयार करण्यात आलेली शेवगा रोपे रुपये ५ या दराने विक्री करण्यात आलेली आहेत.

---

**औरंगाबाद शहरातील सिडको वसाहतीतील रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत**

**(४८) ४९०७० (०३-०७-२०१४) श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील सिडको वसाहतीतील रस्त्यांची दुरुस्ती गत सात वर्षापासून न केल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१७) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २००६-०७ मध्ये सिडको वसाहत औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये हस्तांतरीत झाली. यानंतर ही वसाहत ज्या प्रमाणात मोडते त्या प्रभागात महानगरपालिकेतर्फे रस्त्यांच्या दुरुस्ती करता सन २००६ ते २०१४ या कालावधीत साधारणपणे रु. ३३/- कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

---

**राज्याची यंत्रमागाचा दर्जा सुधारावा यासाठी नवीन अर्थसहाय्य योजना राबविण्याबाबत**

**(४९) ५००५३ (१५-०४-२०१४) श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची यंत्रमागाचा दर्जा सुधारावा यासाठी नवीन अर्थसहाय्य योजना राबविण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) तसेच सदर योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री.चंद्रकांत पाटील (१९-०४-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) केंद्र पुरस्कृत Pilot Scheme of in-situ upgradation of Plain Power loom for S.S.I. Sector अंतर्गत साध्या यंत्रमागांना जोडतंत्र प्रदान करण्याकरिता केंद्र शासनाकडून प्रतिमाग रुपये १५०००/- अर्थसहाय्य देय आहे. केंद्र शासनाने अर्थसहाय्य केलेल्या अशा यंत्रमाग धारकांना राज्य शासनाकडून प्रतिमाग रुपये १००००/- व प्रत्येक यंत्रमाग धारकास जास्तीत जास्त रुपये ८०,०००/- इतके अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.

सदर पथदर्शी योजना राज्यात मालेगांव व नागपूर येथील पॉवरलूम क्लस्टरसाठी लागू केली आहे.

या योजनेची अंमलबजावणी दिनांक २८ एप्रिल, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सुरु आहे.

---

**अंबरनाथ-बदलापूर (जि, ठाणे) या शहरांचा विकास होण्यासाठी पालिकांचे एकत्रिकरण करुन त्यांना महापालिकांचा दर्जा देणेबाबत**

**(५०) ५०७६८ (०१-०७-२००९) श्री. संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ-बदलापूर (जि. ठाणे) या शहरांचा विकास होण्यासाठी अंबरनाथ-बदलापूर पालिकांचे एकत्रिकरण करुन त्यांना महापालिकेचा दर्जा द्यावा अशी मागणी तेथील रहिवासी अनेक वर्षापासून करीत असल्याने माहे डिसेंबर, २००८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१७) :** (१) व (२) विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर महानगरपालिका स्थापनेबाबत समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.